दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ३ रे अंक २८६ वा मंगळवार दि.२३ एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## ग्रामीण जनतेच्या हिताचे अनेक निर्णय घेऊन मोदी सरकारने प्रत्यक्ष अंमलबजावणी केली भाजपा युवा नेते ऋषिकेश दादा कराड यांचे प्रतिपादन





लातूर दि. २२- सर्वाधिक काळ सत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेसने निवडणुकीत मोठ मोठी दिलेली आश्वासने कधीच पूर्ण केली नाहीत मात्र पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील भाजपा शासनाने देशभरातील शहराबरोबरच ग्रामीण भागातील जनतेला दिलासा देणारे अनेक निर्णय घेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी केली असल्याचे भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी बोलून दाखविले.

रेणापूर तालुक्यातील मौजे हरवाडी येथे रविवारी सायंकाळी ग्रामस्थांशी युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने संवाद साधला. यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, विस्तारक दिलीप पाटील, हारवाडीचे उपसरपंच चंद्रकांत माने यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकसभेची निवडणूक देशाच्या प्रश्नांबरोबरच ग्रामीण भागातील विकास कामासाठी अत्यंत महत्त्वाची असून केंद्र शासनाच्या माध्यमातून ग्रामीण भागात नरेंद्र मोदी यांनी गोरगरीब सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून अनेक योजना सुरू केल्या असे सांगून ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि खा. सुधाकर शृंगारे यांच्यावर एक रुपयाच्या भ्रष्टाचाराचा आरोप विरोधी पक्षाला आजपर्यंत करता आला नाही अशा निस्वार्थी आणि जनहिताचा विचार करणाऱ्या नेतृत्वाच्या पाठीशी आपण सर्वांनी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे त्यांनी केलेल्या कामाला साथ देण्यासाठी आणि येणाऱ्या काळात आपल्या भागातील विकास कामाला गती देण्यासाठी येत्या सात तारखेला कमळाच्या चिन्हा समोरील बटन दाबून भाजपा महायुतीला प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले.


यावेळी महेंद्र गोडभरले आणि दशरथ सरवदे यांनी भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून हरवाडी गावात आणि रेणापूर तालुक्यात झालेल्या विविध विकास कामाचा आढावा दिला. यावेळी हरवाडी येथील नानासाहेब माने, अशोक गंगथडे, मारुती हाके, अशोक पोळ, यशवंत इंगळे, विशंभर माने, तुकाराम चोथे, शेषराव माने यांच्यासह ग्रामस्थ मतदार भाजपा आणि मित्र पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिता आणि भावाच्या भुमिकेतून पंतप्रधान नरेंद्र मोदींचे महिलांना पाठबळ : डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर



लातूर/प्रतिनिधी : पिता आणि भावाच्या भुमिकेतून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना पाठबळ दिले आहे. मागील दहा वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी महिलांसाठी विविध योजना अंमलात आणल्या असून महिलांना आरक्षण देण्याचे कामही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच नेतृत्वातील सरकारने केलेले असल्याचे मत डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी व्यक्त केले. महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ लातूर शहर महिला मोर्चाची बैठक गिरवलकर मंगल कार्यालयात संपन्न झाली. यावेळी डॉ. चाकूरकर बोलत होत्या. मंचावर माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, लातूर शहर महिलाध्यक्षा रागिनीताई यादव, शहर सरचिटणीस मीनाताई भोसले, सुप्रियाताई पायाळ, केशरताई श्रृंगारे आदींची उपस्थिती होती. डॉ. अर्चनाताई पाटील म्हणाल्या की, काँग्रेसच्या कार्यकाळात महिलांना बरोबरीची वागणूक दिली जात नव्हती. महिलांना सन्मान मिळत नव्हता. महिलांच्या विकासासाठी योजना राबविल्या जात नव्हत्या. पुरुषांच्या बरोबरीने महिलांना स्थान मिळावे यासाठी काँग्रेसकडून प्रयत्न केले जात नव्हते उलट त्यांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात होती. भाजपामध्ये महिलांना देवी, माता आणि बहीण म्हणून सन्मानित केले जाते. ही भाजपाची संस्कृती आहे. त्यामुळे लातूर मतदारसंघातील महिला वर्गाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भूमिकेला समर्थन देत सर्वांगीण विकासासाठी खा. सुधाकर शृंगारे यांना विजयी करावे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी मार्गदर्शन करताना आ. निलंगेकर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने गेल्या १० वर्षामध्ये महिला वर्गासाठी विविध योजना अमलात आणल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी करण्यासाठी आणि त्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडविण्यासाठी कोट्यवधींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. मातृवंदना योजनेतून महिलांचा सन्मान करण्याचे काम मोदी सरकारने केले असून आगामी काळात देशातील तब्बल ३.५ कोटी महिलांना लखपती करण्याचा संकल्प पंतप्रधान मोदीजींनी केला आहे. पंतप्रधानांनी महिला वर्गाच्या पाठीशी ताकद उभी केली आहे. महिलांमध्ये इतिहास घडविण्याची सक्षमता असून आगामी लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून लातूर मतदारसंघातून पुरुषांपेक्षा महिलांनी अधिक मतदान करून नवा लातूर पॅटर्न घडवावा, असे आवाहनही आ. निलंगेकर यांनी केले. बैठकीचे प्रास्ताविक शहर महिला जिल्हाध्यक्षा रागिनी यादव यांनी केले. या बैठकीत लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील पक्ष पदाधिकारी व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## अशोक हनवते यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने वाढदिवसानिमित्त दिल्या शुभेच्छा



लातूर :- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई जिल्हा शाखा लातूरचे जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते यांचा २२ एप्रिल रोजी वाढदिवसानिमित्त लातूर जिल्हा कार्यकरणीच्या वतीने त्यांचा केक,पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार करताना जिल्हाध्यक्ष अशोक देडे,उपाध्यक्ष अफसरभाई कारभारी,शहराध्यक्ष महादेव डोंबे,सामाजिक कार्यकर्ते रघुनाथ बनसोडे, हमीदभाई पठाण व डीटीपी ऑपरेटर विष्णू शिंदे आदि दिसत आहेत.






## संपादकीय....

# आली ती घटिका!

हा हा म्हणता दिवस जात राहिले, प्रचाराच्या तोफा धडाडत राहिल्या आणि पहिल्या टप्प्यातील मतदान पारसुद्धा पडले. आता दुसरा, तिसरा ते सातवा टप्पा संपेपर्यंत मतदान होत राहील. त्यानंतर उत्सुकता असेल ती २ जून रोजी लागणार्या निकालाची. घरोघरी जाऊन प्रचार करणे प्रचंड उन्हाळ्यात जवळपास अशक्य असते. पूर्वी कोपर्याकोपर्यावर छोट्या-मोठ्या सभा घ्यायचे, तेही आजकाल बंद पडले आहे. जो काय प्रचार करायचा, तो थेट सोशल मीडियावरून केला जात आहे.त्यात राज्यापुरते बोलायचे तर महायुतीला आणि देशात बोलायचे तर एनडीएला एक ब-ँड ॲम्बेसिडर सापडलेला आहे. त्याचा प्रचार झंजावत आणि इतर कोणाच्या प्रचाराशी त्याची तुलना संभवत नाही. त्यामुळे जो काय प्रचार होईल तो टीव्ही चॅनलवरून, विविध सोशल मीडियावरून, त्याचबरोबर प्रत्येक पक्षाचे आयटी सेल असतात, त्यांच्यामार्फत खर्या-खोट्या बातम्या पसरवून केला जात असतो. खर्या-खोट्या म्हणजे खर्या बातम्या आपल्या पक्षाबद्दलच्या आणि खोट्या बातम्या विरोधी पक्षाबद्दल पसरविल्या जातात.बदनामी, अपप्रचार, सवंग बोलणे, बोलताना घसरणे हे सर्व प्रकार या निवडणुकांमध्ये सुरू आहेत. या सर्वांशिवाय या निवडणुकांमध्ये रंगत आणली आहे ती राजकारणाचा खेळखंडोबा करणार्या बंडोबांनी. काही बंडखोर तर इतके भाग्यवान आहेत की, त्यांना चक्क दिल्लीवरून किंवा मुंबईवरून स्पेशल विमान घेण्यासाठी आले होते. माढा मतदारसंघातील एका बंडखोराला खास विमानाने सागर बंगल्यावर बोलावले होते. केवढा तो मान? म्हणजे एखाद्या गृहस्थाला थंड करण्यासाठी समुद्रकिनारी बोलावून, त्याला समजावून सांगून किंवा बोचकारून पण शांत करणे भाग आहे. सदरील बंडखोर विमानाने मुंबई येथे पोहोचले खरे, त्याला समजावण्यात पण आले आणि त्यानंतर ते आपल्या गावी पोहोचले आणि दुसर्या दिवशी थेट विरोधी पक्षाच्या तंबूत दाखल झाले.याचा अर्थ मानसन्मान कितीही केला तरी बंड करणारा जर बंड करणारच असेल तर आमचे म्हणणे असे की, स्पेशल विमान वगैरे इतका लाखो रुपये खर्च कशाला करायचा? त्यापेक्षा त्याच्यशी फोनवर बोलून एक घाव दोन तुकडे करून घेतलेले बरे राहणार नाही का? परंतु तसे होत नाही. इंजिनचे सर्वेसर्वा नवनिर्माणकर्ते हे पण दिल्लीला स्पेशल विमानाने जाऊन आले. किती खर्च आला असेल? कोणी केला असेल? देव जाणे. आम्हास असे वाटते की, ज्या गोष्टी फोनवरून बोलून करता आल्या असत्या, त्याच्यासाठी इतका प्रचंड खर्च का केला जातो, हे त्यांनाच माहीत. सध्या राज्याच्या अवकाशात विमाने आणि हेलिकॉप्टर सातत्याने घिरट्या घालत आहेत.राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांना अजिबात वेळ नसतो, त्यामुळे ते विमानाने विमानतळापर्यंत आणि तिथून पुढे हेलिकॉप्टरने जात असतात; कारण एका दिवसामध्ये राज्याच्या या भागातून त्या भागात आणि या टोकाकडून त्या टोकाकडे जाताना विमान हेच सर्वात उत्तम वाहन ठरते. तुम्हा-आम्हासारख्या सर्वसामान्य जनतेला हा प्रश्न पडलेला असतो की, या सभांना जमणारी लाखो लोकांची गर्दी ही खरंच त्या नेत्याचे भाषण ऐकण्यासाठी आलेली असते काय? एवढ्या उन्हात स्वतःचा जीव धोक्यात घालून, उष्माघाताची पर्वा न करता, गर्दीची पर्वा न करता, किती वेळ लागेल याची चिंता न करता प्रचंड संख्येने सभास्थळाकडे गर्दी करतात.

# प्रेरणागीत वादात !

शिवसेना ठाकरे गटाच्या 'शंखनाद होऊ दे, रणदुंदुभी वाजू दे, नादघोष गर्जू दे विशाल' या मशाल गीतात फक्त एकदा 'जय भवानी' व 'हिंदू' हा शब्द वापरण्यात आला आहे त्यावरून आयोगाने ठाकरे गटाला नोटीस बजावली आहे. आता उद्धव ठाकरे यांनी हे शब्द काढणार नाही, अशी भूमिका घेत उलट आयोगालाच आव्हान दिले आहे. प्रसंगी या प्रकरणी आम्ही न्यायालयातही जाऊ, असा इशाराही उद्धव ठाकरेंनी दिला आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या मशाल गीतातील 'जय भवानी' व 'हिंदू' हा शब्द कोणत्याही परिस्थितीत वगळणार नाही. 'जय भवानी, जय शिवाजी' ही आमची घोषणा आहे. आज 'जय भवानी' हा शब्द काढायला सांगताय उद्या 'जय शिवाजी' हा शब्द काढायला सांगाल. ते अजिबात खपवून घेणार नाही, असे शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी रविवारी निवडणूक आयोगाला ठणकावले. कारवाई करायची असेल तर आधी 'बजरंग बली'च्या नावाने मते मागणा-या पंतप्रधान मोदींवर करा, रामलल्लाचे मोफत दर्शन देण्याचे आश्वासन देणा-या केंद्रीय गृहमंत्री अमित शहांवर करा, असे आव्हान उद्धव ठाकरे यांनी आयोगाला दिले आहे. शिवसेनेत झालेल्या बंडानंतर निवडणूक आयोगाने शिवसेना ठाकरे गटाला 'धगधगती मशाल' हे निवडणूक चिन्ह दिले आहे. त्यावर आधारित पक्षाने ६० सेकंदाचे 'शंखनाद होऊ दे' हे प्रचारगीत तयार केले आहे.या मशाल गीतामध्ये 'जय भवानी' व 'हिंदू' शब्द असल्याने निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरे यांना नोटीस बजावली आहे. धर्माच्या आधारावर प्रचार असा आक्षेप या संदर्भात घेण्यात आला आहे. त्यावर उद्धव ठाकरे यांनी 'मातोश्री' निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार परिषदेत उलट निवडणूक आयोगालाच आव्हान दिले. या वेळी उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या सभांमधील भाषणांची क्लिप पत्रकारांना ऐकवली. मध्य प्रदेश निवडणुकीच्या वेळी 'बजरंग बली'च्या नावावर मत द्या, असे पंतप्रधान मोदी म्हणाले होते. या शिवाय आम्हाला मत दिल्यास रामलल्लाचे मोफत दर्शन, असे अमित शहा जाहीर सभेत बोलले होते. निवडणुकीत धर्माच्या मुद्यावर प्रचार करणे नियमांच्या विरुद्ध आहे. असे असताना मोदी आणि शहा हिंदुत्वाचा प्रचार करीत आहेत. त्याची तक्रार पक्षाने निवडणूक आयोगाकडे केली होती मात्र, त्याबाबत अद्याप कोणतेही उत्तर आलेले नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले. धर्माच्या नावाखाली प्रचार केल्या प्रकरणी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना निवडणूक आयोगाने ६ वर्षांसाठी मतदान करण्यावर तसेच निवडणूक लढविण्यावर बंदी घातली होती, याची आठवणही उद्धव ठाकरे यांनी करून दिली. आम्ही मोदी-शहा यांच्याबाबत तक्रार करूनही काहीही उत्तर आले नाही.यावर निवडणूक आयोगाने उत्तर न दिल्यास नियम बदलला आहे, असे आम्ही समजू आणि आम्हीदेखील असा प्रचार केला तर तुम्हाला कारवाई करता येणार नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले. ठाकरेंच्या या युक्तिवादाला खोडून काढणे आयोगाला जमणार नाही हे उघड आहे. 'जय भवानी, जय शिवाजी' ही घोषणा महाराष्ट्रातील जनतेच्या मनामनात आहे. आम्ही गाण्यातील 'जय भवानी' शब्द काढणार नाही. निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या कुलदेवतेचा अपमान केल्याचा आरोप केल्यास आयोगाकडे याचे उत्तर आहे काय? असा सवालही उद्धव ठाकरे यांनी केला. मोदी-शहा देवाच्या नावावर मते मागतात त्यांच्यावर कारवाई का नाही? या बिनतोड सवालाचे उत्तर निवडणूक आयोगाकडे खचितच नसणार! आयोगाचे नियम सर्वांसाठी समान असायला हवेत; परंतु तसे होताना दिसत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार हे अनेकदा अत्यंत वादग्रस्त विधाने करतात आणि नंतर माफीही मागतात. सध्या त्यांचे सारे लक्ष पत्नी सुनेत्रा पवार यांना बारामती मतदारसंघातून विजयी करण्याकडे आहे. त्यासाठी ते पुणे जिल्ह्यात सतत सभा घेत आहेत. या सभांमधून ते अप्रत्यक्षपणे धमकावताना दिसले. मी पाहिजे तेवढा निधी देतो; पण मशिनमध्ये माझ्यासाठी कचाकचा बटण दाबा म्हणजे निधी द्यायला मला बरे वाटेल नाही तर मी हात आखडता घेईन, या त्यांच्या वक्तव्याने राजकीय क्षेत्रात खळबळ माजली; परंतु निवडणूक आयोगाला ती दिसली नाही! उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी अजित दादांच्या वक्तव्यावर कठोर टीका करताना म्हटले की, अजित पवार स्वतः व्यापारी आहेत त्यामुळे ते सौदा करणारच. आपला देशच एक व्यापारी चालवतो आहे त्याने ठिकठिकाणी असे एजंट नेमले आहेत. शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर उद्धव ठाकरे यांची निशाणी पण गेली. त्यांना धनुष्य-बाण सोडून मशाल हाती घ्यावी लागली. आता मशाल गीतावरून निवडणूक आयोगाने त्यांना कोंडीत पकडले आहे. मशाल गीतातील 'जय भवानी' आणि 'हिंदू' शब्दावर निवडणूक आयोगाने आक्षेप घेतला आहे. त्यावर उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाला थेट आव्हान दिले आहे. आई तुळजाभवानी महाराष्ट्राचे कुलदैवत आहे.छत्रपती शिवाजी महाराजांना तुळजाभवानीचा आशीर्वाद होता. भवानी तलवारीचा प्रसंग सा-यांच्या हृदयात कोरला गेला आहे. 'जय भवानी, जय शिवाजी' हा जयघोष राज्यातील जनता रोज करते त्यामुळे आम्ही जय भवानी असो की हिंदू हे शब्द कोणत्याही परिस्थितीत हटवणार नाही. जे लोक हिंदू धर्माच्या नावाने मते मागतात त्यांच्यावर कारवाई होत नाही. आम्ही काही हिंदू धर्माच्या नावाने मते मागितली नाहीत आणि जर कारवाई करायचीच असेल तर आधी मोदी-शहा यांच्यावर करा मग आमच्यावर. एकूण वस्तुस्थिती लक्षात घेता आयोगाला उद्धव ठाकरे यांच्यावर कारवाई करणे अवघड जाईल. राजकीय नेत्यांनी प्रचारात राजकीय नितीमत्तेला तिलांजली देत आचारसंहितेची 'ऐशी की तैशी' करून सोडली आहे. राजकीय नेत्यांची दादागिरीची विधाने निवडणुकीचे पावित्र्य धोक्यात आणणारी आहेत त्याला आयोग आवर कसा घालणार? मत दिले तरच निधी देणार, असे म्हणणे म्हणजे निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेची खिल्ली उडविण्यासारखे आहे.




# टक्का घसरला!

सत्ताधारी भाजपने एकीकडे 'चार सौ पार'चा नारा देत विकसित भारतासाठी पुन्हा मोदी सरकारचे आवाहन केले आहे तर दुसरीकडे सामान्यांना 'न्याय' देण्यासाठी विरोधकांच्या काँग्रेसप्रणीत 'इंडिया' आघाडीने मतदारांना सत्तापरिवर्तनाचे आवाहन केले आहे. दोन्ही बाजूंनी प्रचाराचा जोरदार धडाकाही उडवून देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी झालेल्या मतदानात मतदार उत्साहाने मतदानासाठी घराबाहेर पडतील अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात मतदारांमध्ये फारसे उत्साहाचे वातावरण असल्याचे पहायला मिळाले नाहीच. त्यामुळे २०१९च्या मतदानाच्या तुलनेत यावेळी मतदानाचा टक्का घसरल्याचेच चित्र पहायला मिळाले.हे चित्र सत्ताधा-यांसोबतच विरोधकांनाही चिंतेत टाकणारेच आहे. महाराष्ट्रात पूर्व विदर्भातील पाच मतदारसंघांसाठी शुक्रवारी मतदान झाले. रामटेक मतदारसंघासह उर्वरित चारही मतदारसंघांत मतदानाचा टक्का २०१९ च्या तुलनेत घसरल्याचेच पहायला मिळाले. नागपूर मतदारसंघात २०१९ ला ५४.७४ टक्के मतदान झाले होते. यावेळी ते ५३.९० टक्क्यांवर आले. जवळपास ४६ टक्के मतदारांनी मतदानाकडे चक्क पाठ फिरवली. चंद्रपूर मतदारसंघात २०१९ मध्ये ६४.८४ टक्के मतदान झाले होते. यावेळी ते २ टक्क्यांनी घटून ६२ टक्क्यांवर आले. गडचिरोली मतदारसंघात २०१९ मध्ये ७२ टक्के मतदान झाले होते. यावेळी ही टक्केवारी तब्बल ६ टक्क्यांनी घसरून ६६.२७ टक्क्यांवर आली. भंडारा-गोंदिया मतदारसंघात २०१९ मध्ये ६८.२७ टक्के मतदान झाले होते. यावेळी ते ६१.३७ टक्क्यांवर घसरले. रामटेक मतदारसंघातही २०१९च्या ६२.१२ टक्के मतदानाच्या तुलनेत यावेळी ५९.५८ टक्के अशी घसरण पहायला मिळाली.२१ राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील १०२ जागांसाठी देशभरात झालेल्या मतदानाची सरासरी ६०.०३ टक्के एवढी राहिली. त्रिपुरामध्ये सर्वाधिक ७९.९० टक्के तर बिहारमध्ये सर्वांत कमी ४७.४९ टक्के मतदान झाले. यंदाच्या निवडणुकीत लोकसभेच्या जागांच्या संख्येनुसार सात टप्प्यांतील हा सर्वांत मोठा टप्पा होता. ९ केंद्रीय मंत्री, दोन माजी मुख्यमंत्री आणि एका माजी राज्यपालाचे भवितव्य या टप्प्यात मतदान यंत्रात बंद झाले आहे. अंदमान-निकोबारमध्ये ५६.८७, अरुणाचल प्रदेशात ६५.४६, आसाम ७१.३८, बिहार ४७.४९, छत्तीसगड ६३.४१, जम्मू-काश्मीर ६५.०८, लक्षद्वीप ५९.०२, मध्य प्रदेश ६३.३३, महाराष्ट्र ५५.२९, मणिपूर ६८.६२, मेघालय ७०.२६, मिझोराम ५४.१८, नागालँड ५६.७७, पुद्दुचेरी ७३.२५, राजस्थान ५०.९५, सिक्कीम ६८.०६, तामिळनाडू ६३.२०, त्रिपुरा ७९.९०, उत्तर प्रदेश ५७.६१, उत्तराखंड ५३.६४, पश्चिम बंगाल ७७.५७ टक्के मतदान झाले. मतदानाची ही टक्केवारी पाहता पहिल्या टप्प्यात तरी सत्ताधारी वा विरोधकांना मतदारांमध्ये आपापल्या बाजूने लाट वा उत्साह निर्माण करण्यात अपयशच आल्याचे दिसते.मतदारांची मतदानातील ही उदासीनता सत्ताधारी व विरोधक या दोघांचीही चिंता वाढविणारी आहे. पहिल्या टप्प्यात तरी राजकीय पक्षांना मतदारांमध्ये नेहमीचे उत्साहाचे वातावरण तयार करण्यात अपयश आले, असाच याचा अर्थ निघतो. कदाचित पहिल्या टप्प्यासाठी ज्या भागात मतदान झाले तेथील राजकीय चित्र अगोदरच ब-यापैकी स्पष्ट असल्याचाही हा परिणाम असू शकतो. या टप्प्यात तामिळनाडूत सर्वच्या सर्व ३९ जागांसाठी मतदान झाले आहे. या राज्यात इंडिया आघाडीतील द्रमुक व काँग्रेस पक्षाचे निर्विवाद वर्चस्व आहे. मात्र, भारताच्या उर्वरित भागात होणारे जागांचे नुकसान भरून काढण्याच्या दृष्टीने भाजपने या राज्यात प्रचंड जोर लावला आहे. भाजपने अण्णाद्रमुकशी असणारी आघाडी तोडून यावेळी द्रमुक व अण्णाद्रमुक या दोघांशीही हातमिळवणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यादृष्टीने भाजपने प्रदेशाध्यक्ष के. अन्नामलाई यांना 'फ्री हँड' दिला आहे. अन्नामलाई यांनीही दोन्ही प्रादेशिक पक्षांवर टीकेची झोड उठवत मोठी वातावरणनिर्मिती केली आहे. त्यामुळे भाजपला या निवडणुकीत आपला मतांचा टक्का वाढण्याची आशा आहे. तो वाढूही शकतो. मात्र, त्यामुळे किती जागांवर विजय मिळेल याबाबत साशंकताच आहे.२०१९च्या निवडणुकीत भाजपने उत्तर भारतासह बहुतांश ठिकाणी आजवरची सर्वोत्तम कामगिरी नोंदविली होती. मात्र, दक्षिण भारतात भाजपला अद्यापही हात-पाय पसरता आलेले नाहीत. त्यामुळेच २०१९नंतर भाजपने तामिळनाडूवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. उत्तर भारतीय वा हिंदी भाषिक पक्ष हा शिक्का पुसून काढण्याचा भाजपचा आटोकाट प्रयत्न आहे. 'तामिळ-काशी संगमन' आयोजित करून उत्तर-दक्षिण सांस्कृतिक मनोमिलन घडवण्याचे प्रयत्न भाजपने केले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक प्रचारसभा घेऊन तामिळनाडू अक्षरश: पिंजून काढला आहे. सनातन धर्माच्या मुद्यावरून मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन व त्यांचे पुत्र उदयनिधी यांच्यावर टीकेचा भडिमार करतानाच या मुद्यावरून काँग्रेसची कोंडी करण्याची खेळी भाजपने केली आहे. याद्वारे अण्णाद्रमुकचा हिंदू धर्माला मानणारा मतदार आपल्याकडे खेचून आपला पाया भरण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. भाजपच्या या प्रयत्नांना तामिळनाडूचे मतदार कसा प्रतिसाद देतात हे यावेळच्या निवडणुकीवरून ठरणार आहे. तामिळनाडूत यावेळी चांगली कामगिरी होण्याची भाजपला आशा आहे. तसेच प. बंगालमध्येही जागा वाढविण्याचा भाजपचा आटोकाट प्रयत्न आहे.



राजस्थानच्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यातील वातावरण बरेच बदलले असल्याने येथे काँग्रेस भाजपला धक्का देणारी कामगिरी करू शकतो असा अंदाज आहे. एकंदर पहिल्या टप्प्यातील १०२ जागांचे २०१९ चे बलाबल पाहता इंडिया आघाडीचे वर्चस्व स्पष्ट आहे. इंडिया आघाडीला या टप्प्यात आपली कामगिरी सुधारण्याची पूर्ण संधी आहे. त्या दृष्टीने तामिळनाडूत झालेले ६३.२० टक्के मतदान हे दोन्ही बाजूंना मतदारांमध्ये उत्साह निर्माण करण्यात आलेले अपयशच आहे, असेच म्हणावे लागेल! असो! एकंदर पहिल्या टप्प्यातील मतदानात मतदारांनी फारसा न दाखविलेला उत्साह ही सत्ताधारी व विरोधक या दोघांसाठीही चिंतेची बाब असल्याने पुढील टप्प्यांमध्ये मतदानाचा उत्साह वाढविण्यावर सर्व राजकीय पक्षांना भर द्यावा लागणार आहे, हे मात्र निश्चित!

# सिवुड येथे सलग चार दिवस महामानवांची जयंती उत्साहात साजरी.

नवी मुंबई / के. एच. हनवते :– (सिवुड) बौद्धजन विकास संघ, बौद्धजन महिला विकास संस्था व बौद्धजन युवा विकास संघाच्या वतीने सिवूड येथे सलग चार दिवस महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. १३ एप्रिल रोजी महीलांचा व लहान मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध स्पर्धा परीक्षा घेण्यात आल्या. १४ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली. १५ एप्रिल रोजी जागर समतेचा हा विद्रोही जलसा सादर केला. १६ एप्रिल रोजी विद्रोही कवी संमेलनाचा कार्यक्रम आयोजित केला सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे भा.प्र.से. विजय नाहटा होते बौद्धजन विकास संघाचे सभासद संतराम कांबळे यांची कन्या वृषाली संतराम कांबळे हीने यु.पी.एस.ची परिक्षा उत्तीर्ण करून आय.ए.एस. झाली तिचा सत्कार करण्यात आला. तसेच विभागातील सामाजिक कार्यकर्ते भिमराव पवार यांची मुलगी बी.ए.एम.एस.डेटिंस्ट डॉ.




अवंतिका पवार झाली., आयु. कवडे यांची कन्या श्वेता कवडे सी.ए.झाली यांचा सत्कार करताना विजय नाहटा म्हणाले मी ३३ वर्षे आयुक्त काम करताना कायम बाबासाहेब आंबेडकर ठेवले माझ्या पदाचा वापर सर्वसामान्य जनतेच्या हीतासाठी केला. बौद्धजन विकास संघाचे अध्यक्ष राम झेंडे यांनी विजय नाहटा यांचा सत्कार केला. सदर जयंती यशस्वी करण्यासाठी विजय हाबळे, शैलेश जावळे, राहुल चंदनशिवे, संजय लोंढे, धनाजी कांबळे, एन.के. शिंदे, तुकाराम कांबळे, घाटविसावे, अरूण रणधिर, सदर



कार्यक्रमास वैअळो वेळी सहकार्य करणारे भारतीय बौद्ध महासभा सिवुड शाखेचे अध्यक्ष संजय झनके गुरूजी यांचा विजय नाहटा यांचे हस्ते सत्कार करण्यात अला, डॉ. मिता ताई गंगावणे, रूपाली कांबळे, दिपाली शिलेवंत, मालन बडवे, तरकसे ताई, अक्षय जाधव, किरण यादव, केदार बनसोडे, डावरे मंथन ओवाळ यांच्या संपूर्ण टीमने मोलाचे सहकार्य केले.

# धोक्यातील संविधान मतदारांनी वाचवावे

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) या देशाचे संविधान आज धोक्यात आहे. लेकीबाळींची सुरक्षा धोक्यात आहे. शेतमालाला भाव मिळत नाही. सरकार बोलून सामान्यांची खोटंनाटं फसवणूक करीत आहे, असे आरोप शिवसेना उबाठा गटाच्या सुषमा अंधारे यांनी येथे केला. किनवट येथील गोंड राजे मैदानावर हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार नागेश आष्टीकर यांच्या



प्राचारार्थ शुक्रवारी सायंकाळी सुषमा अंधारे यांची सभा पार पडली. पावसामुळे सभा उशिरा सुरू झाली तरी पावसातही ही सभा पार पडली. यावेळी माजी मंत्री शिवाजीराव मोघे, माजी आमदार प्रदीप नाईक, ख्वाजा बेग, ज्योतिबा खराटे, जनाबाई डुडुळे, मारोती दिवसे, काँग्रेसचे सूर्यकांत रेड्डी, माहूरचे नगराध्यक्ष फेरोज दौसानी, प्रकाश राठोड, अनिल कन्हाळे, रामा उईके, समाधान जाधव, किसन राठोड, डॉ. निरंजन केशवे, गजानन मुंडे, प्रेमसिंग साबळे, विशाल जाधव, के. मूर्ती, प्रशांत कोरडे, अतुल दर्शनवाढ ,अविनाश चव्हाण, सुभाष नाईक,रुणवाल आदींची मंचावर उपस्थिती होती. खोटंनाटं बोलून मतदारांमध्ये हे

# पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तत्काळ मदत द्या

लातूर : लातूर, रेणापूर, औसा या तालुक्यांसह लातूर जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे व गारपिटीमुळे काढणीला आलेल्या गहू, ज्वारीबरोबरच आंबा, द्राक्ष व पालेभाज्यांचे आतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे तातडीने पंचनामे करून शेतकरी बांधवांना सरकारने भरीव आर्थिक मदत करावी, अशी मागणी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी आज केली. राज्याच्या वेगवेगळ्या भागात सध्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाला सुरवात झाली आहे. अनेक ठिकाणी गारपीटही झाली आहे. 'लातूर



ग्रामीण'सह लातूर जिल्ह्याला अवकाळी पावसाचा तडाखा बसला आहे. त्यामुळे गहू, ज्वारीचे पीक भुईसपाट झाले आहे. ज्वारीचे पीक भिजल्याने चाऱ्याचाही प्रश्न उद्भवणार आहे. वादळी वाऱ्यांमुळे अनेक भागात आंब्याचे, द्राक्षांचे मोठे नुकसान झाले आहे. टोमॅटोसह फळभाज्या व पालेभाज्यांनाही अवकाळी पावसाचा मार बसला आहे. वीज पडल्याने जनावरे दगावली असल्याच्याही घटना जिल्ह्यात ठिकठिकाणी घडल्या आहेत. अवकाळी पावसामुळे शेतकरी चिंतेत आहेत. दुष्काळामुळे शेतकरी आधीच हतबल झाला आहे. दुष्काळाचा सामना करीत जगवून काढणीला आलेले पीक आणि फळांचेही अवकाळी पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. याची त्वरित दखल घेवून राज्य सरकारने नुकसानीचे पंचनामे करावेत आणि शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत तातडीने द्यावी, असे आमदार श्री. धिरज देशमुख यांनी सांगितले.

# अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी धावून आले आमदार धिरज देशमुख

लातूर : नेहरू नगर तांडा येथे कार व टेम्पोचा भीषण अपघात झाल्याचे पाहून 'लातूर ग्रामीण'चे आमदार धिरज विलासराव देशमुख हे अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी धावून गेले. स्वतःच्या वाहनातून जखमींना लातूरमधील रुग्णालयात पोचवले. त्यामुळे जखमी व्यक्तींना वेळेवर उपचार मिळू शकले. रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील एका समारंभासाठी आमदार धिरज देशमुख रविवारी (ता. २१) गेले होते. हा समारंभ संपल्यानंतर ते लातूरकडे परतत असताना नेहरू नगर तांडा येथे हा अपघात झाला. यावेळी आपली वाहने थांबवून



आमदार धिरज देशमुख यांनी जखमींना तत्काळ मदत केली.

# सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी आपले सरकार आणायचे आहे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख

छत्रपती संभाजीनगर –देशात आदरणीय राहुल गांधी, आदरणीय शरद पवार साहेब, उद्धव ठाकरे सामान्य माणसाच्या हक्कासाठी लढत असून सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी आपले सरकार आणायचे आहे. विद्यमान सरकार महागाई, भ्रष्टाचार, बेरोजगारी या विषयावर काहीच करू शकले नाही, आणि हे सर्व प्रश्न निकाली काढण्यासाठी आपल्याला सामान्य माणसाचे सरकार देशात व राज्यात दोन्ही ठिकाणी आणावे लागेल असे, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक

कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे. छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी शिवसेना (उबाठा) गटाचे अधिकृत उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी आज सोमवार दि. २२ एप्रिल रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौक या ठिकाणाहून संस्थान गणपती शहागंज पर्यंत महाविकास आघाडी

सर्व घटक पक्षाच्या वतीने रॅलीच्या माध्यमातून शक्ती प्रदर्शन करण्यात आले.

दरम्यान माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांचे एमजीएम गोल्फ क्लब मैदान हेलिपॅडवर काँग्रेस कमिटी पदाधिकारी यांच्याकडून स्वागत करण्यात आले. त्यानंतर त्यांनी संस्थान गणपती मंदिर शहागंज येथील श्री चे मनोभावे पूजन करून दर्शन घेतले. यावेळी काँग्रेस पक्षाचे जितेंद्र देहाडे,



भाऊसाहेब पाटील, नामदेवराव पवार, संजय वाघचौरे, काँग्रेसचे शहराध्यक्ष–शेख युसूफ, अनिस पटेल, सलीम खान, प्रकाश मुगदीया, खैसर बाबा, अभय खस्तार यांच्यासह महाविकास आघाडी घटक पक्षाचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती. उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्या पाठीशी महाविकास आघाडी खंबीरपणे उभी यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमीत विलासराव देशमुख म्हणाले की, भारताच्या सार्वत्रिक निवडणुका सर्वत्र होत असून छत्रपती संभाजी नगर लोकसभा मतदार संघातील आपले उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्या निवडणूक प्रचार सभेच्या निमित्ताने आज एकत्र आलेलो आहोत. गेल्या अनेक दशकापासून येथील सक्षम नेतृत्व आणि आदरणीय लोकनेते विलासराव देशमुख यांचे स्नेह पूर्ण संबंध गेले कित्येक दिवस पाहिले आहेत. आज ते आपले उमेदवार आहेत आणि त्यांच्या पाठीशी महाविकास आघाडी खंबीरपणे उभी आहे. राज्यात व देशात राजकारण सुरू आहे ते जनतेला अजिबात मान्य नाही आणि हे आपण या निवडणुकीच्या माध्यमातून आपणास दाखवून देण्याची वेळ आली आहे. आज देशात आदरणीय राहुल गांधी, आदरणीय शरद पवार साहेब, उद्धव ठाकरे सामान्य माणसाच्या हक्कासाठी लढत असून सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी आपले सरकार आणायचे आहे. विद्यमान सरकार महागाई, भ्रष्टाचार, बेरोजगारी या विषयावर काहीच करू शकले नाही आणि हे सर्व प्रश्न निकाली काढण्यासाठी आपल्याला सामान्य माणसाचे सरकार देशात व राज्यात दोन्ही ठिकाणी आणावे लागेल. चंद्रकांत खैरे यांनी आपली ही निवडणूक शेवटची असल्याचे भावनिक आवाहन केले असले तरी आपल्याला मिळणारा जनतेचा प्रतिसाद पाहता ते प्रचंड मताधिक्याने निवडून येतील यात शंका नाही असे म्हणत आपण सर्वांनी त्यांना साथ द्यावी असे आवाहन केले. देशाला व राज्याला एका नव्या विचाराची गरज लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून आलेल्या संधीचे सोने करावे पुढे बोलताना माजी मंत्री अमित देशमुख म्हणाले की, या देशाला व राज्याला एका नव्या विचाराची गरज असून महाविकास आघाडीचे ग्यारंटी कार्ड प्रसिद्ध झाले आहे. आणि यानुसार देशात इडिया अघाडी सरकार सत्तेत येताच पहिल्या बैठकीत सदर ग्यारंटी कार्डची अंमलबजावणी इंडिया आघाडी सरकार करेल, असाविश्वास व्यक्त करीत आपले उमेदवार चंद्रकांत खैरे यांना विजयी करावे आणि देशातील व राज्यातील सद्याची परिस्थिती बदलण्यासाठी लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून आलेल्या संधीचे सोने करावे असेही आवाहन सभेतील उपस्थिताना

# चैत्यभूमी येथे महामानवाला विनम्र अभिवादन करून जरांगे पाटील इंदिरानगर सिंधी कॅम्प चेंबूर येथील संयुक्त प्रतिष्ठान जयंतीत सामील






बृहमन मुंबई / चेंबूर प्रतिनिधी :– १४ एप्रिल २०२४ रोजी इंदिरानगर सिंधी कॅम्प चेंबूर मुंबई आयोजक : संयुक्त प्रतिष्ठान च्या वतीने चेंबूर येथे महामानव प.पु. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी या कार्यक्रमस्थळी मराठा आरक्षण लढाऊ योद्धा : जरांगे पाटील हे सर्व प्रथम दादर मुंबई येथील चैत्यभूमीला विनम्र अभिवादन करून चेंबूर इंदिरानगर येतील होत आसलेल्या संयुक्त प्रतिष्ठान जयंती कार्यक्रमास कार्यकर्त्यांच्या विनंतीला मान देऊन उपस्थित राहीले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले. व सर्व उपस्थितांना आणि सर्व जनतेस महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती दिनाच्या मंगलमय हार्दिक शुभेच्छा दिल्या त्यावेळी समाजसेवक : विशाल गंगाधर हनवते ( विशाल इंटरप्राईज ), रोहित गंडले, प्रवीण कोकणे व संयुक्त प्रतिष्ठान चे सर्व सदस्य यांनी जरांगे पाटील यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार केला आणि त्या सोबत अरुण इंगळे व तसेच चेंबूर सखल मराठा सदस्य, रिपाई (आ) कार्यकर्ते : नंदु गंडले, गंगाधर हनवते, दशरथ जगताप, दगडू खंडारे, राहुल हनवते, इत्यादी लहान थोर कार्यकर्त्यांनी कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. आणि त्यानंतर जरांगे पाटील हे पुढील कार्यक्रम श्री वैजनाथ सेवा मंडळ चेंबूर येथील अखंड हरीनाम सप्ताह कार्यक्रमात भेट दिली. आसे आमचे दैनिक महावृत्त प्रसिद्धी प्रमुख के. एच. हनवते यांना माहीती दिली.

# गीत, गायन, पोवाडा, पथनाट्य अन् रिल्समधून जनजागृती

नांदेड : लोकसभा निवडणुकीसाठी दि. २६ रोजी मतदारांनी मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडावे, यासाठी जिल्हा प्रशासनाने सोमवारी गीत, गायन,पोवाडा, पथनाटय, ओव्या, रिल्समधून मतदानासाठी जनतेला साद




संदीप माळोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, शिक्षणाधिकारी सविता बिरगे, माधव सलगर यांच्यासह जिल्हा परिषदेचे, मनपाचे अनेक अधिकारी उपस्थित होते.प्रारंभी मतदान जनजागृती पोवाडा सादर

घातली. प्रत्येक कर्मचा–यांने किमान ५० मतदारांना मतदानासाठी प्रेरित करण्याचा संकल्प शेकोडोंच्या संख्येने, उपस्थित कर्मचा–यांनी नांदेड पोलीस परेड ग्राउंडवर केला. दुस–या टप्प्यात मोठ्या प्रमाणात मतदान व्हावे यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या मार्गदर्शनात व महानगरामध्ये मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या मार्गदर्शनात मोठ्या प्रमाणात जनजागृती सुरू आहे. या कार्यक्रमांमध्ये नांदेड लोकसभा निवडणुकीसाठी आलेले खर्च निरीक्षक डॉ. दिनेशकुमार जांगिड, खर्च निरीक्षक मग्पेन भुटिया यांच्यासह जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी करण्यात आला. राज्याच्या सदिच्छा दूत डॉ. सानवी जेठवाणी यांनी मनोगत व्यक्त केले. हदगाव तालुक्यातील उमरी येथील विद्यार्थ्यांनी अप्रतिम पथनाट्य सादर केली. मतदान वाढविण्यामध्ये आपले योगदान देणा–या विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी म्हणून तालुकास्तरावरून निवड झालेल्या तीन विद्यार्थ्यांची भाषणे लक्षवेधी ठरली. एमजीएम कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे नृत्य यासोबतच एनसीसी, स्काऊट –गाईडच्या विद्यार्थ्यांचे पथसंचलन बचत गटांच्या महिलांसाठी व अंगणवाडी महिलांसाठी वेगवेगळ्या स्पर्धा, स्लोगन, रिल्स, शॉर्ट फिल्म, ओव्या, स्वीप प्रश्नमंजुषा आधीच स्पर्धांमध्ये प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांसह प्रा.राहुल चौधरी यांना पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्याहस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# लातूर पोलिसांचे नागरिकांना आवाहन खोट्या अफवा पसरणाऱ्यावर गुन्हे दाखल करणार





लातूर :- लातूर पोलिसांचे नागरिकांना आवाहन खोट्या अफवा पसरणाऱ्यावर गुन्हे दाखल करणार याबाबत थोडक्यात माहिती अशी की, गेल्या एक महिन्यापासून पो. स्टे. विवेकानंद चौक, लातूर हद्दीतील महादेव नगर, बाभळगाव रोड, रहेमानियाँ मस्जीद जवळील नगर मध्ये एका मनोरुग्ण अज्ञात व्यक्तीने महिलेचे कपडे कापले वरुन पो.स्टे. ला गुन्हा दाखल करून ०३ लोकांना पोलीसांनी अटक करून जेलमध्ये पाठविले आहे. तसेच चोराचा ड्रामा करणारे ०२ इसमांना अटक करून कार्यवाही केली आहे. तसेच रात्रीचे हातात रॉड, तलवारी व कत्ती असे घातक हत्यार घेऊन फिरणारे ०४ लोकांवर भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे आदेशाने दररोज शहरात ५० पोलीस अंमलदार, २२ आर. सी.पी. चे जवान, ०५ पोलीस निरीक्षक व सपोनि दर्जाचे अधिकारी व सरकारी पोलीस वाहन १० असे रात्री २३.०० ते ०५.०० वा. पर्यंत शहरातील सर्व भागात नाईट पेट्रोलींग करीत आहोत.

उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली प्रत्येक नगरात शांतता बैठक घेऊन, तसेच लाऊडस्पीकरवर अफवावर विश्वास ठेवु नयेत म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे व पोलीस ठाणे विवेकानंद चे पोलीस निरीक्षक मुंडे यांनी
१) म्हाडा कॉलनी
२) महादेव नगर
३) एस.ओ.एस.
४) इकबाल चौक
५) मळवटी रोड
६) प्रबुध्द नगर
७) सिध्दार्थ सोसायटी
८) बाभळगाव रोड
९) कृपा सदन रोड
१०) तुळजापूरे नगर
११) लिज्जत पापड रोड
१२) नगर पालिका शाळा क्र. १६ या ठिकाणी लाऊडस्पीकर
लावून नागरीकांना एकत्र जमवुन शांतता बैठक घेऊन चोरांचे अफवावर विश्वास न ठेवण्या बद्दल पोलीसा तर्फे अवाहन केले. तसेच प्रत्येक गल्लीत २० ते २५ मुलांना पोलीसचे कार्ड देऊन ग्राम सुरक्षा सदस्य करण्यात येत आहे.

सध्या राज्यात लोकसभा निवडणुकीची आदर्श अचार संहिता चालू आहे. नागरीकांनी अफवावर विश्वास ठेऊ नये, कोणतेही व्हिडीओ सोशल मिडियावर अपलोड करून काहीजन भफकेबाज प्रसिध्दी मिळावी या हेतूने व समाजात दहशत पसरवीत आहेत. खात्री न करता जुन्या बातम्या , फोटो, व्हिडिओ प्रसिध्द करीत आहोत.

तसेच गल्लीतील खोडकर मुले स्वतःहा चोरा सारखा पोशाख करून हातात कत्ती, काठी घेऊन, कपडे काढून, तोंड बांधून व्हिडीओ करून टाकीत आहेत. तसेच यापुर्वी राज्यातील इतर शहरातील व भागातील जुने व्हिडीओची खात्री न करता टाकीत आहेत.

'जनतेच्या/नागरीकांच्या सेवेत लातूर पोलीस २४ तास सर्तक आहेत, केंव्हाही उरळश्र ११२ संपर्क साधावा त्यांना तात्काळ मदत मिळेल. तसेच नागरिकांनी अफवावर विश्वास ठेवू नये किंवा खोट्या अफवा पसरवू नये असे आवाहन लातूर जिल्हा पोलीस दलाकडून करण्यात येत आहे. यापुढे खोट्या अफवा पसरणाऱ्याचा शोध घेऊन त्यांच्यावर प्रचलित कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

# २००५ पासून झगडणार्या शिक्षकास उच्च न्यायालयाच्या दणक्यामुळे मिळाला न्याय

लातूर :- उदगीर येथील संत ज्ञानेश्वर माऊली प्राथमिक विद्यामंदिर शाळेतील शिक्षक वीरभद्र शिवशंकर स्वामी या शिक्षकास औरंगाबाद खंडपीठाच्या दणक्यामुळे न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,उदगीर येथील संत ज्ञानेश्वर माऊली प्राथमिक विद्यामंदिरमध्ये रिक्त झालेल्या जागेवर शिक्षक म्हणून नियुक्ती झाली.सुरुवातीला ही नियुक्ती विना अनुदानित तत्त्वावर झाली व नंतर प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी त्यांना मान्यता दिली तेव्हा पासून ते सदरील शाळेवर कार्यरत आहेत.१६ सप्टेंबर २००७ रोजी वीरभद्र स्वामी यांना विना अनुदान तत्त्वावर मान्यता देण्यात आली.तसेच २०१६ या वर्षी संस्थेला शासनाने २० टक्के अनुदान मंजूर केले.परंतु सदरील शाळा व भारतीय महिला शिक्षण संस्थेने त्यांच्या ऐवजी दुसर्याच शिक्षकाचा अनुदानासाठी प्रस्ताव व बिले दाखल केली.

शाळा व संस्थेच्या या नाराजीने वीरभद्र स्वामी यांनी ॲड.रामराव बिरादार यांच्यामार्फत याचिक क्रमांक १२७८३/२०१७ नुसार याचिका औरंगाबाद खंडपीठात दाखल केली.सदरील याचिकेची वेळोवळी सुनावणी झाली व दि.२ एप्रिल २०२४ रोजी मा.उच्च न्यायालयाचे न्या.विभा कंकणवाडी व न्या.एच.जी. चपळगावकर यांच्या पिठाने अंतिम सुनावणी घेवून सदरील याचिका निकालासाठी राखीव ठेवली व दि.१६ एप्रिल २०२४ रोजी सदरील याचिका निकाली काढत ती अंशतःमंजूर केली.संस्था व शाळेला दि.१६ जून २०२१४ ते १६ जून २०१७ या कालावधीतील वेतन रक्कम हे प्राथमिक शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद,लातूर यांच्याकडे दाखल करण्याचा आदेश दिला व सदरील बिल मंजूर अनुदानाप्रमाणे दाखल करण्याचा तसेच प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी सदरील बिलाची वेतननिश्चिती करुन प्रतिवादी संस्था व शाळेला कळवून तीन महिन्याच्या आत अदा करण्याचा आदेश मा.उच्च न्यायालयाने पारित केला.वीरभद्र स्वामी यांच्यावरील झालेला अन्याय उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे दूर झाला आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे स्वामी यांचे नाव अनुदानामध्ये समाविष्ट करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ही सर्व प्रक्रिया तीन महिन्याच्या आत मा.उच्च न्यायालयाने प्रतिवादी क्र.३ प्राथमिक शिक्षणाधिकारी,४ व ५ शाळा व संस्था यांना मा.उच्च न्यायालयाने आदेश दिला आहे.

# निवडणूक सामान्य निरीक्षकांनी केली स्ट्रॉंग रुमची पाहणी







लातूर :- भारत निवडणूक आयोगाने लातूर लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी नियुक्त केलेले निवडणूक सामान्य निरीक्षक निरंजन कुमार यांनी मतदान यंत्र सुरक्षा कक्षाची (स्ट्रॉंग रुम) पाहणी केली. तसेच सुरक्षेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेतला. तहसीलदार सौदागर तांदळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे उपअभियंता दत्तात्रय इंगळे, जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता रोहीत जगताप यावेळी उपस्थित होते. स्ट्रॉंग रुमची पाहणी करून निवडणूक सामान्य निरीक्षक निरंजन कुमार यांनी सुरक्षिततेसाठी स्ट्रॉंग रुमच्या सुरक्षिततेसाठी सीसीटिव्ही व्यवस्था आणि मतमोजणी कक्षाची माहिती घेतली. स्ट्रॉंग रुम परिसरातील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेवून संबंधितांना अनुषंगिक सूचना दिल्या.

# नवी मुंबईची सुकन्या वृषाली कांबळे हिने (यूपीएससी) मध्ये मिळवले उज्ज्वल यश



नवी मुंबई / के. एच. हनवते :- नवी मुंबई हे देशातील नामांकित शहर (यूपीएससी) स्पर्धा परीक्षेमध्ये देशभरातून ३१० वा रँक प्राप्त करून नवी मुंबईची सुकन्या : वृषाली संतराम कांबळे हिने उज्ज्वल यश संपादित केले असून तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. नवी मुंबई शहरातील वृषाली ही पहिलीच कन्या असून सर्वसामान्य कुटुंबात वृषालीने वयाच्या अगदी २४ व्या वर्षी यशाला गवसणी घातली आहे. जिद्द आणि चिकाटीने २०२३ ला पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा, आणि मुलाखत या तिन्हीमध्ये घवघवीत यश मिळवत देशातून ३१० वा रँक मिळवला असुन आई वडिलांचे स्वप्न साकार केले आहे. बार्टीच्या माध्यमातून शिष्यवृत्ती मिळवत यूपीएससीचे क्लास दिल्ली मध्ये लावून स्पेशल विषय पॉलिटिकल सायन्स घेतला. वृषालीच्या आई वडिलांनी वृषाली च्या मनावर अगदी लहान पनापासूनच यूपीएससीचे स्वप्न दाखवत तिच्या मनावर तसे संस्कार केल्याचे वृषालीच्या आई संगीता कांबळे हिने सांगितले. आपल्या आई वडिलांचे असलेलं स्वप्न वृषालीने पूर्ण केले असुन आम्हाला खूप आनंद झाला झाला आहे. विविध स्पर्धा परीक्षेत बसणार्या मुलांनी देखील हार न मानता जिद्दीने पुढे गेले पाहिजे असे वृषालीच्या आई-वडिलांनी सांगितले. वृषाली हिचे मूळ गाव उतूर, तालुका आजरा, जिल्हा कोल्हापूर असून नवी मुंबईतील नेरुळ येथे ती कुटुंबासह स्थायिक आहे. तिच्या उज्ज्वल यशाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे निमंत्रक आणि नवी मुंबई भीम महोत्सवचे प्रणेते शरदभाऊ सरवदे, अध्यक्ष उत्तम कांबळे, भगवान खुपटे, अरुण अंभोरे, विजय कांबळे, संजय केदारे, संजय गायकवाड, चंद्रभान चंदनशिव, प्रदीप कांबळे यासह राजकीय, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी वृषाली कांबळे हिचे अभिनंदन करून भावी उज्वल कारकीर्दीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# अशोक हनवते यांचा मिलिंद नगर मित्र मंडळाच्या वतीने वाढदिवस उत्साहात साजरा



लातूर :- अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर यांचा वाढदिवस २२ एप्रिल रोजी मिलिंद नगर येथे मध्यरात्री १२ वाजून ०५ मिनिटांनी फटाक्याच्या आतिश बाजीने केक कापून अतिशय हर्ष उल्हासात आनंदात साजरा करण्यात आला यावेळी विवेक हनवते,डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रणव सुरवसे, प्रकाश बनसोडे, शुभम ससाने, उत्कर्ष भुतकर, विक्रम बनसोडे, पृथ्वीराज गांधले, आदर्श बनसोडे, समाधान उजगिरे, सुनील उर्फ बाब्या शृंगारे आदी उपस्थित होते



# रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात ९ उमेदवारांमध्ये लढत

रत्नागिरी : लोकसभा निवडणुकीसाठी रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघासाठी ९ उमेदवारांनी १३ अर्ज दाखल केले होते. ते सर्व अर्ज वैध ठरले होते. अर्ज माघारी घेण्याच्या अंतिम दिवशी, सोमवारी ९ पैकी एकाही उमेदवाराने अर्ज मागे न घेतल्याने हे सर्वच उमेदवार आता निवडणुकीत लढत देणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.लोकसभेच्या निवडणुकीसाठी रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघासाठी उद्धवसेनेचे उमेदवार विनायक राऊत, महायुतीचे उमेदवार नारायण राणे, बहुजन समाज पार्टीचे राजेंद्र आयरे, सैनिक समाज पक्षाचे सुरेश शिंदे, वंचित बहुजन आघाडीचे मारुतीकाका जोयशी, बहुजन मुक्ती पार्टीचे अशोक पवार आणि शकील सावंत, अमृत तांबडे, विनायक लहू राऊत हे तीन अपक्ष उमेदवार असे मिळून एकूण नऊ उमेदवारांनी रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून अर्ज सादर केले होते.उद्धवसेनेचे उमेदवार विनायक राऊत यांनी चार अर्ज तर महायुतीचे उमेदवार नारायण राणे यांनी दोन अर्ज तसेच अन्य उमेदवारांनी प्रत्येकी एक अर्ज दाखल केला. छाननीअंती हे सर्व अर्ज वैध ठरल्याने नऊ जणांची उमेदवारी अधिकृत झाली. आज, सोमवारी (दि. २२) सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत होती. परंतु या उमेदवारांपैकी कुणीही माघार घेतली नाही. त्यामुळे आता निवडणुकीच्या रिंगणात हे नऊही उमेदवार लढत देणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE